रे.मु.नं.११०८/२०२२ मधील निशाणी १७ वरिल आदेश.
योगिता आरडे वि. भाऊसाहेब भांगे

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ , २ व ४ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफियत दाखल करुन घेण्याकामी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादी यांनी कथन केले आहे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरूद्ध दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळण्यासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याची समन्स मिळाले होते व त्यानंतर प्रतिवादी हे वकीलांमार्फत हजर झाले. सदर दाव्याची कैफियत मुदतीत दाखल करणे गरजेचे होते. परंतु, दाव्याची कागदपत्रे महसुल कार्यालयातुन मुदतीत मिळु शकले नाही. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये आपसात तडजोडीचे बोलणे चालु होते. परंतु तडजोड यशस्वी झाली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी मुदतीत कैफियत दाखल करू शकला नाही. प्रतिवादींची कैफियत दाव्यात दाखल झाली नाही तर प्रतिवादींचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल म्हणुन त्यांना कैफियत दाखल करण्याची संधी द्यावी, ही विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर वादीचे म्हणणे मागवण्यात आले. वादीने प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतलेला आहे. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादीचा सदरचा अर्ज खरा व बरोबर नाही. अर्जातील कथने बनावट आहेत. अर्जामध्ये नमुद केलेले कारण हे संयुक्तीत व रास्त वाटत नाही. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज रू. ५,०००/- कॉस्ट करून नामंजुर करण्यात यावा.

४. उभयपक्षकारांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा प्रतिवादींविरूद्ध दावा मिळकतीचे वाटप होऊन मिळण्यासाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही स्थावर मिळकत असुन उभयपक्षकारांचे हक्क त्यात गुंतलेले आहेत. प्रस्तुत प्रकरण गुणदोषावर निकाली काढण्याकरीता प्रतिवादींचे म्हणणे व कैफियत गरजेची दिसुन येत आहे. प्रतिवादी याने सदरील अर्जाच्या पृष्ठयर्थ नि.क्र.१८ वर शपथपत्र दाखल केले आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदरचा अर्ज मंजुर केल्यास दावा हा त्याच्या गुणदोषावर ठरवता

येईल. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादींना एक संधी देणे योग्य व न्यायोचित होईल. परंतु त्याचवेळी वादींना झालेला विलंब लक्षात घेणे गरजेचे आहे, म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र. १ , २ व ४ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ , २ व ४ यांनी वादींना दंडापोटी रक्कम रु.१०००/- दयावेत. तदनंतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.06.20 11:23:00 +0530

दि.१९/०६/२०२५
नेवासा.

**(ए. एन. सरक)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा.